# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४


क्रमांकः शुनिप्रा/सूचना/1062/२०२५ दिनांक : 31.07.2025

## सूचना

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थी/पालक/ संबंधीत संस्था यांना सूचना.**

**वाचा :** १) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४(५).

२) प्राधिकरणाचे दि. २८/०८/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

३) दि. ०९/१०/२०२४ रोजी प्राधिकरणाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची नियमावली

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण / विधी /कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना या सूचनेद्वारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी किती शुल्क दयावे याबाबत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे -

"कलम १४(५) नुसार कोणतीही संस्था, एखाद्या विद्यार्थ्यांकडून एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करणार नाही आणि एखाद्या शैक्षणिक वर्षात एका वर्षापेक्षा अधिक वसूल केलेले शुल्क हे, कॅपीटेशन फी असल्याचा अर्थ लावण्यात येईल आणि अशी संस्था तिच्याविरुध्द कार्यवाही केली जाण्यास पात्र असेल."

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी फक्त एकाच वर्षाचे शुल्क भरावे. जर संस्थांनी एका वर्षापेक्षा जादा शुल्क घेतले तर त्याबाबतची तक्रार पुराव्यासह प्राधिकरणाच्या fra.govmh@gmail.com या ईमेलवर करता येईल.

तसेच सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्यानंतरच Caution Money प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या नियमावली नूसार विद्यार्थ्यांकडून आकारण्यात यावे. सदर विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर Caution Money परत करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

Fees Regulating Authority ★ Maharashtra State ★

संबंधीत संस्थांनी अधिनियम २०१५ मधील कलम १४(५) च्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्याबाबत विद्यार्थी/पालक यांच्याकडून कोणतीही तक्रार प्राधिकरण कार्यालयास प्राप्त झाल्यास व तथ्य आढळल्यास अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ. अर्जुन चिखले भा.प्र.से.**
**सदस्य सचिव**
**शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई**

Fees Regulating Authority
Maharashtra State